# वाघ संस्थेच्या करिअर डेव्हलपमेंट सेंटरला डॉ. कलामांचे नाव

**नाशिक । दि. २१ प्रतिनिधी**



के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील करिअर डेव्हलपमेंट सेंटरला माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे नाव देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवली आहे.

उद्या (दि.२२) सकाळी साडेनऊ वाजता करिअर डेव्हलपमेंटचा नामकरण सोहळा आयोजित करण्यात आला असून एमकेसीएलचे कार्यकारी संचालक तथा के.के. वाघ महाविद्यालयातील सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. विवेक सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. डॉ. कलाम यांनी सायन्स आणि टेक्नॉलॉजीमध्ये केलेल्या भरीव कामाचा आदर्श नव्या पिढीसमोर राहावा यासाठी डॉ. कलाम यांचे नाव देण्याचा निर्णय संस्थेने घेतल्याची माहिती अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य के. एन. नांदुरीकर यांनी दिली. या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांसाठी ५ मुलाखत कक्ष, दोन ग्रुप डिस्कशन कक्ष, १०० संगणक असलेला सुसज्ज हॉल तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

गतवर्षी के.के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ४५० विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून नामांकित कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली आहे. सदर सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी आणि उद्योग जगतामध्ये सुसंवाद घडवून उद्योगांना पूरक विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. नामकरण ...

---

येथून वाहन व्यवस्था करण्यात ...
माहितीसाठी संपर्क : प्रा दीपक दळवी - ९८२३५०३८६५.

# के. के. वाघ अभियांत्रिकीमधील डॉ. कलाम गायडन्स सेंटरचे उद्घाटन



**नाशिक** | के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम करियर गायडन्स सेंटरचे उद्घाटन महाराष्ट्र ज्ञान मंडळाचे कार्यकारी संचालक तथा के. के. वाघ शिक्षण संस्थेचे सल्लागार समितीचे अध्यक्ष विवेक सावंत यांच्या हस्ते झाले. ३५०० स्क्वे. फुटाच्या सेंटरमध्ये पाच मुलाखत व दोन ग्रुप डिस्कशन कक्ष, १०० संगणक, व्हिडिओ कॉन्फरन्स हॉल आहेत. या वेळी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशीनाथ टर्ले, विश्वस्त देवराम शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.